# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com


क्र.कोविम/माध्य.परीक्षा/ 695
दिनांक - 28/07/2021

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा / सांगली / कोल्हापूर

विषय :- सन २०२१-२२ च्या इयत्ता ११ वी प्रवेशसंदर्भात घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेबाबत(CET)...

संदर्भ :- राज्य मंडळाचे जा.क्र.रा.मं./परीक्षा-२/४३७३ दिनांक २७/०७/२०२१ चे पत्र.

महोदय,

सन २०२१-२२ च्या इयत्ता ११ वी प्रवेशसंदर्भात घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेची (CET) आवेदनपत्रे सादर करणेबाबतचे प्रकटन सोबत जोडले आहे. तरी सदर बाब आपल्या माध्यमिक शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावी.

(देविदास बा.कुलाळ),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

विषय : सन २०२१-२२ च्या इयत्ता ११ वी प्रवेशासंदर्भात घेण्यात येणाऱ्या सामाईक प्रवेश परीक्षेबाबत (CET)..

## प्रकटन

---

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत शासन निर्णय दि.२८ मे, २०२१ व दि.२४ जून, २०२१ नुसार इ.११ वी प्रवेशासंदर्भात संपूर्ण राज्यामध्ये सामाईक प्रवेश परीक्षेचे **(CET)** आयोजन करण्यात येत आहे. राज्यमंडळाची माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ पूर्वी उत्तीर्ण/प्रविष्ठ झालेले विद्यार्थी आणि सीबीएसई, आयसीएसई व अन्य मंडळांचे विद्यार्थी यांना सामाईक प्रवेश परीक्षेची आवदेनपत्र ऑनलाईन पध्दतीने बुधवार दिनांक २८/०७/२०२१ रोजी दुपारी ३.०० पासून दि.०२.०८.२०२१ अखेर (रात्री ११.५९) **https://cet.11thadmission.org.in** या संकेतस्थळावरुन भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर सामाईक प्रबेश परीक्षेसाठी उपरोक्त विद्यार्थ्यांना रु.१७८/- + बॅंकिंग चार्जेस/ पेमेंट गेटवे चार्जेस असे शुल्क भरावे लागणार आहे. यासाठी पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

संगणक प्रणालीमध्ये आवेदनपत्र भरण्यासाठी खालील माहिती नोंदवावी लागणार आहे.

१) ई-मेल आयडी (उपलब्ध असल्यास)

२) मोबाईल क्रमांक नोंदविणे अनिवार्य आहे.

३) विद्यार्थ्याने परीक्षेचे माध्यम नोंदविणे आवश्यक आहे.

४) विद्यार्थ्याने सेमी इंग्रजीचा विकल्प निवडल्यास त्याला इंग्रजी, गणित व विज्ञान या विषयांच्या प्रश्नांसाठी इंग्रजी माध्यम असेल. तथापि सामाजिक शास्त्रे (इतिहास व राज्यशास्त्र, भूगोल) या विषयासाठी विद्यार्थ्यास अन्य एक माध्यम निश्चित करावे लागेल.

५) राज्यमंडळाची माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा सन २०२१ पूर्वी उत्तीर्ण/प्रविष्ठ झालेले विद्यार्थी आणि सीबीएसई, आयसीएसई व अन्य मंडळांचे विद्यार्थी इत्यादिंनी फोटो आयडी, पासपोर्ट साईज फोटो, नमुना स्वाक्षरी इत्यादी कागदपत्रे स्कॅन करुन संगणक प्रणालीत अपलोड करावी लागणार आहेत.

६) सदर परीक्षेसाठी विद्यार्थ्यास त्याच्या तात्पुरत्या/कायमच्या निवासस्थानाच्या पत्त्यानुसार परीक्षा केंद्र मिळण्यासाठी जिल्हा व तालुका/शहराचा विभाग (**WARD**) निश्चित करावा लागेल.

७) दिव्यांग विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रात दिव्यांगत्वाचा प्रकार निवडून निश्चित करावा तसेच त्याबाबतची आवश्यक कागदपत्रे संगणक प्रणालीत अपलोड करावी लागतील.

उपरोक्तप्रमाणे प्रथम आवश्यक माहिती तयार/निश्चित करून ठेवावी व तद्नंतर इ.११ वी प्रवेशासाठी आयोजित सामाईक प्रवेश परीक्षेचे आवेदनपत्र भरण्याची कार्यवाही करावी.

**दि.२०/७/२०२१ ते दि.२१/७/२०२१ या कालावधीत ज्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण प्रक्रिया करून सामाईक प्रवेश परीक्षेसाठी मंडळाकडे अर्ज सादर केलेले आहेत त्यांना आपल्या अर्जाचा तपशील पूर्वीचा अर्ज क्रमांक (Application No.) व आवेदनपत्र भरताना नोंदविलेला मोबाईल क्रमांक टाकून उपरोक्त संकेतस्थळावर पाहता येईल. सदर प्रक्रियेदरम्यान परिपूर्ण अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. मात्र प्रक्रिया पूर्ण करू न शकलेल्या उमेदवारांचा तपशील संकेतस्थळावर उपलब्ध नसल्यास त्यांनी नव्याने अर्ज सादर करणे आवश्यक राहील.**

सामाईक प्रवेश परीक्षेसंदर्भात विद्यार्थी, पालक व अन्य संबंधीत घटकांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी मंडळामार्फत यापूर्वी हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचा तपशील

मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना सदर प्रक्रियेच्या तांत्रिक बाबींसंदर्भात अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी ९८२३००९८४१ या टोल फ्री क्रमांकावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेत संपर्क साधावा. सदर क्रमांक उपरोक्त संकेतस्थळाच्या होम पेजवर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

राज्यमंडळाची माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा सन २०२१ पूर्वी उत्तीर्ण/प्रविष्ठ झालेले विद्यार्थी आणि सीबीएसई, आयसीएसई व अन्य मंडळांचे विद्यार्थी, पालक व संबंधित अन्य घटकांनी याची नोंद घ्यावी.

दि. २८/०७/२०२१

(देविदास बा.कुलाळ),
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

टि.पा.क्र.